**<u>ठळक बातम्या</u>**

- सोमनाथ स्वाभिमान पर्वात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा सहभाग
- चालू आर्थिक वर्षात देशाची वित्तीय तूट सकल देशांतर्गत उत्पादनाच्या ४ पूर्णांक ४ दशांश टक्केपर्यंत रोखणं शक्य असल्याचा पीडब्ल्यूसी चा अहवाल
- महाराष्ट्रात २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांचा प्रचार शिगेला
- फ्रान्स आणि लॅक्झेंबर्गचा दौरा आटोपून परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर आज मायदेशी परतले
- रशियाने यूक्रेनवर नुकत्याच केलेल्या हल्ल्यांनंतर दोन्ही देशांमधील संघर्षाबाबत संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेची आपत्कालीन बैठक उद्या

**आणि**

- न्यूझीलंड विरुद्धच्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात नाणेफेक जिंकून भारताचा प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय

**<><><><><>**

सोमनाथचा इतिहास हा विजय आणि पुनर्निर्माणाचा तसंच आपल्या पुर्वजांच्या पराक्रम, त्याग आणि बलिदानाचा इतिहास आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. ते आज गुजरातमधल्या सोमनाथ इथं सोमनाथ स्वाभिमान पर्वानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. विदेशी आक्रमकांनी सोमनाथ आणि भारताला नष्ट करायचा अनेकदा प्रयत्न करूनही सोमनाथ आणि भारत नष्ट झाले नाहीत, आपल्या पूर्वजांनी प्राणाचं बलिदान देऊन त्यांचं रक्षण केलं, असं प्रधानमंत्री म्हणाले.

**होल्ड बाईट मोदी**

**त्याआधी** सोमनाथ स्वाभिमान पर्वाचा भाग म्हणून भव्य शौर्ययात्रा निघाली. गुजरातच्या विविध भागातून आलेले १०८ अश्व आणि डमरू वादक पथक या यात्रेत सहभागी झाले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी फुलांनी सजवलेल्या वाहनावर आरूढ होत यात्रेचं नेतृत्व केलं. यावेळी प्रधानमंत्र्यांनी काही वेळ ढोल वादनही केलं. रस्त्याच्या दुतर्फा जमलेल्या भक्तगणांनी यात्रेवर पुष्पवर्षाव केला आणि हर हर महादेवचा जयघोष केला. यात्रेच्या मार्गावर विविध ठिकाणी उभारलेल्या व्यासपीठांवर देशभरातून आलेल्या कलाकारांनी नृत्याचं सादरीकरण केलं.

**यानंतर** प्रधानमंत्री राजकोटला रवाना होणार आहेत. राजकोटमधे ते मारवाडी विद्यापीठात आयोजित सौराष्ट्र -कच्छ व्हायब्रंट समिटचं उद्घाटन करतील. त्यानंतर संध्याकाळी गांधीनगर इथं महात्मा गांधी मेट्रो स्थानकाचं उद्घाटन करणार आहेत.

**दरम्यान**, सोमनाथ स्वाभिमान पर्वानिमित्त ८ जानेवारीपासून विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी कालपासून गुजरात दौऱ्यावर आले आहेत. प्रधानमंत्र्यांनी काल ओमकार जप कार्यक्रमात सहभाग घेतला तसंच सोमनाथ मंदिराचा एक हजार वर्षाचा इतिहास सांगणारा ड्रोन शो बघितला. यावेळी देशभरातून आलेल्या भाविकांनी प्रधानमंत्र्यांचं स्वागत केलं. कार्यक्रमात सहभागी झाल्याबद्दल प्रधानमंत्र्यांनीही सर्वांचं अभिनंदन केलं. याप्रसंगी गायक हंसराज रघुवंशी यांच्या भजन गायनाचाही भाविकांनी आनंद लुटला.

**<><><><><>**

चालू आर्थिक वर्षात देशाची वित्तीय तूट सकल देशांतर्गत उत्पादनाच्या ४ पूर्णांक ४ दशांश टक्केपर्यंत रोखण्याचं उद्दिष्ट साध्य होण्याची शक्यता असल्याचं पीडब्ल्यूसी

या पतमानांकन संस्थेच्या अहवालात म्हटलं आहे. ही तूट यापेक्षाही कमी राहील, आणि यामुळे आर्थिक व्यवस्थापनातली भारताची मजबूत स्थिती जागतिक पातळीवर अधोरेखित होत असल्याचं या संस्थेचे प्रतिनिधी राणेन बॅनर्जी यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्रात २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांचा प्रचार शिगेला पोहोचला आहे. प्रचार संपण्यासाठी केवळ तीनच दिवस राहिले असून विविध पक्षांनी प्रचारात जोर लावला आहे. जाहीर  सभा, रोड शो, तसंच समाज माध्यमांवरदेखील प्रचाराला रंग चढला आहे. मतदानाच्या आधीचा रविवार असल्यानं आज अधिकाधिक मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न उमेदवार करत आहेत.

**धारावीचा** पुनर्विकास खासगी विकसकामार्फत नव्हे तर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत होत आहे, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या पुनर्विकास प्रकल्पाचं भूमीपूजन होईल असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल प्रचारसभेत दिलं.

**ठाणे** शहरात पाणी, कचरा व्यवस्थापन आणि इतर नागरी सुविधा पुरवण्यात महायुतील अपयश आल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केला.१५ जानेवारीला मतदान होणार असून लगेचच दुसऱ्या दिवशी म्हणजे १६ जानेवारी रोजी मतमोजणी होणार आहे.

**-<><><><><>**

फ्रान्स आणि लॅक्झेंबर्गचा दौरा आटोपून परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर आज मायदेशी परतले. सध्याच्या जागतिक परिस्थितीत भारत आणि युरोप यांचे

हितसंबंध परस्परपूरक असल्याचं या दौऱ्यामधून दिसून आल्याचं परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं आहे.

या दौऱ्यात जयशंकर यांनी फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युअल मॅक्रॉन यांची भेट घेतली. तसंच फ्रान्सचे परराष्ट्र व्यवहार मंत्री जीन नोएल बॅरोट यांच्याशी द्विपक्षीय चर्चा केली. दोन्ही देशांमध्ये संरक्षण, सागरी सुरक्षा, आर्थिक सहकार्य, नागरी अणुऊर्जा, अंतराळ, तंत्रज्ञान, स्टार्टअप्स,आरोग्य, शिक्षण, अशा विविध विषयांवर चर्चा झाली. या दौऱ्यात जयशंकर यांनी फ्रान्सच्या लोकप्रतिनिधींनाही संबोधित केलं.

फ्रान्सच्या राजदूतांच्या परिषदेत जयशंकर यांचं भाषण झालं. या परिषदेला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणारे ते पहिले, युरोपबाहेरचे परराष्ट्र मंत्री ठरले.

लॅक्झेंबर्गमध्ये जयशंकर यांनी प्रधानमंत्री ल्युक फ्रीडेन आणि इतर वरिष्ठ नेत्यांशी द्विपक्षीय संबंधांवर चर्चा केली. तसंच तिथल्या भारतीय समुदायाला संबोधित केलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि जर्मनीचे चॅन्सलर फ्रेडरिक मर्झ यांच्यात उद्या अहमदाबाद इथं द्विपक्षीय चर्चा होणार आहे. व्यापार, गुंतवणूक, तंत्रज्ञान, आणि संरक्षण क्षेत्राविषयी यावेळी चर्चा होण्याची शक्यता आहे. व्हेनेझुएलावर अमेरिकेनं केलेल्या आक्रमणासह इतर आंतरराष्ट्रीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर ही भेट होत असून यात जागतिक आव्हानांवर दोन्ही नेते चर्चा करतील अशी अपेक्षा आहे. मर्झ यांचा हा दोन दिवसांचा भारत दौरा ही आशिया खंडातली त्यांची पहिलीच भेट आहे. या भेटीत ते गुजरातमधल्या साबरमती आश्रमालाही भेट देणार आहेत.

**<><><><><>**

बांगलादेशात अल्पसंख्याकांवर हल्ले वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर आणखी एका हिंदू धर्मीय तरुणाला मारहाण करुन जबरदस्तीनं विष प्यायला लावल्याची घटना समोर आली आहे. सुनामगंजमधे देराई इथं मोबाईल फोनचा हप्ता भरण्यावरुन झालेल्या वादात संबंधित तरुणाचा मृत्यू झाला. पोलीस तपास सुरु असल्याचं आकाशवाणी वार्ताहरानं कळवलं आहे.

**<><><><><>**

रशियाने यूक्रेनवर नुकत्याच केलेल्या हल्ल्यांनंतर दोन्ही देशांमधील संघर्षाबाबत संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेची आपत्कालीन बैठक उद्या होणार आहे. युक्रेनचे परराष्ट्र मंत्री आंद्री सिबिहा यांनी ही माहिती दिली. या हल्ल्यांमध्ये मध्यम-पल्ल्याच्या मारक क्षेपणास्त्राचा वापर करण्यात आला होता. हे हल्ले त्वरित थांबवावेत, तसंच यूक्रेनमधील नागरिकांचं संरक्षण, युक्रेनचं सार्वभौमत्व आणि प्रादेशिक अखंडतेसाठी पाठिंबा देण्याचं आवाहन आंद्री सिबिहा यांनी संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेला केलं. तर दोन्ही देशांमधे तणाव वाढवण्यासाठी युरोप जबाबदार असल्याचा आरोप रशियानं केला आहे.

दरम्यान रशियाने केलेल्या हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून काल युक्रेननं रशियाच्या दक्षिणेकडील वोरोनेझ शहरावर ड्रोन हल्ले केले. यात किमान चार जण जखमी झाले आणि अनेक इमारतींचे नुकसान झालं.

**<><><><><>**

भारतीय क्रिकेट संघाच्या यंदाच्या हंगामाचा प्रारंभ आज वडोदरा इथं भारत आणि न्यूझीलंड यांच्यातल्या एकदिवसीय सामन्याने होत आहे. तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेतल्या या पहिल्या सामन्यात नाणेफेक जिंकून भारताच्या संघानं प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला आहे.

आजच्या सामन्यात रोहित शर्मा आणि विराट कोहली खेळणार आहेत, तर ऋषभ पंत दुखापतीमुळे या मालिकेतून बाहेर पडला आहे. मालिकेतला दुसरा सामना येत्या बुधवारी १४ जानेवारी रोजी राजकोट इथं तर तिसरा आणि अंतिम सामना १८ जानेवारी रोजी इंदूर इथं होणार आहे.

**<><><><><>**

महिला प्रीमियर लीग क्रिकेटमध्ये, काल मुंबई इंडियन्सने दिल्ली कॅपिटल्सचा ५० धावांनी पराभव केला. १९६ धावांचा पाठलाग करताना दिल्ली कॅपिटल्सला १४५ धावा करता आल्या. हरमनप्रीत कौरला सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आलं. दिल्ली कॅपिटल्स आणि गुजरात जायंट्स यांच्यातला सामना आज नवी मुंबईच्या डी.वाय. पाटील मैदानावर रंगणार आहे.

**<><><><><>**

दिल्लीसह उत्तर भारतात अनेक ठिकाणी थंडीची लाट येण्याचा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे. ओदिशातही थंडीची लाट राहण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. पुढल्या दोन दिवसात दिल्ली, हरियाणा, चंदीगड, पंजाब, जम्मू आणि काश्मीर, लडाख, बिहार, पश्चिम बंगालचा काही भाग, सिक्कीम, उत्तर प्रदेश आणि उत्तराखंड इथं दाट धुक्याची शक्यता आहे, तर तामिळनाडू. पुद्दुचेरी आणि कारिकल इथं काही ठिकाणी उद्यापर्यंत मुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**//<><><><><>//**